# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/००१५४८**

**अपिलार्थी श्री. इहतेश्याम कुतुबुद्दीन सिद्दीकी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक**
मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय,
एस्प्लनेड, मुंबई ४००००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी**
मुख्य महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय,
एस्प्लनेड, मुंबई ४००००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.११.२०२१**

अपीलकर्ता : व्ही.सी.व्दारे उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.१०.२०१९ | १४.११.२०१९ | २५.११.२०१९ | २१.१२.२०१९ |

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य (मुख्यालय) यांच्याकडे दि. २५.०१.२०२० रोजी द्वितीय अपील सादर केले होते. सदर द्वितीय अपील मुख्यालयाकडून क्र.मुमाआ-२०२०/ अपील हस्तांतरण क्र.२८५/का.१, दि.११.०९.२०२० च्या पत्रान्वये या कार्यालयास दि.११.११.२०२० रोजी प्राप्त झाले आहे. सदर द्वितीय अपील अर्जात त्यांनी अपीलाचे कारण म्हणून असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ८ (१) (g) व महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहिती अधिकार नियमाच्या नियम १३ (d) अनुसार माहिती नाकारली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १४.११.२०१९ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २१.१२.२०१९ संलग्न केलेले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १४.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये दि.२१.०७.२००५ ते दि.०५.०३.२००७ या कालावधीतील खालील मुद्दांची माहिती विचारलेली आहे :-

a. "Kindly furnish the name of accused and case no. of all confessional statement forwarded to MCOCA Court by CMM Shri. S. S. Shirke during his tenure as CMM, from O.W. Register.
b. Kindly furnish the true copy of O.W. Register regarding forwarding of confessions under MCOCA to MCOCA Court by Shri. S. S. Shirke during his tenure as CMM."

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी वरील माहिती अर्जास अनुसरुन दि. १४.११.२०१९ च्या पत्रान्वये अपिलार्थींना खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे:-

"The information sought by you i.e. name of accused and case number of all confessional statements forwarded to MCOCA Court by CMM Shri. S.S. Shirke, during his tenure as CMM from O.W. Register and true copy of O.W. Register regarding forwarding of confession statements to MCOCA Court by Shri. S.S. Shirke, during his tenure as CMM.

The said information was pertaining to confidential section office to Hon'ble CMM, Esplanade, Mumbai. Hence the same was called from confidential section through Assistant Registrar and APIO, Esplanade, Mumbai on 23.10.2019. As per information received from confidential section through Assistant Registrar and APIO, Esplanade, Mumbai 05.11.2019 which was available with the said confidential section, appears from the list of the accused and C.C. number of confessional statements forwarded to MCOCA Court by Hon'ble CMM Shri. S.S. Shirke during his tenure as CMM from O.W. Register, other than you, names of accused and C.C. number are in the O.W. Register.

Hence the name of other accused and C.C. number is the information is exempted vide section 8(1)(g) of Right to Information Act, 2005 i.e. the disclosure of information which would endanger the life or physical safety of that person.

Further the disclosure of said information is also exempted vide rule 13(d) of Maharashtra District courts Right to Information (Revised Rules) 2009 framed by Hon'ble High Court, Bombay i.e. the information which would cause unwarranted invasion of privacy of the individual.

Further, the information sought by you is a third party information in view of section 11 of Right to Information Act, 2005.

Hence the undersigned is unable to furnish the information asked by you for the reasons mentioned above."

४. अपिलार्थींनी दि.२५.११.२०१९रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले होते. सदर प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१२.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहे:-

"Perused the application and say of Public Information Officer. Appellant is absent. The PIO has rightly held that the information sought by the appellant falls under the exemption clause of Section 8(1)(g) of Right to Information Act, 2005, Rule 13(d) of Maharashtra Districts Courts Right to information (Revised Rules) 2009, framed by Hon'ble High Court, Bombay and u/s 11 of RTI Act, 2005. The information sought by the appellant is endanger the life or physical safety of accused, therefore the application filed by appellant was rightly rejected by the PIO. There is no substance in the ground raised in the appeal. The PIO has passed proper order. There is no reason to interfere with the order passed by PIO. The First Appeal is dismissed."

..३/-

५. सुनावणीवेळी अपिलार्थी यांनी असे विषद केले की, त्यांना बॉम्ब स्फोटाच्या प्रकरणात चुकीच्या जबाबाच्या आधारे शिक्षा झालेली असल्याने त्यांनी मागितलेली माहिती ही सार्वजनिक हिताची आहे. तसेच, अशाच स्वरुपाची माहिती त्यांना अपील क्र.३१९२/२०१९ या प्रकरणात देण्याचे आयोगाचे आदेश झालेले आहेत. त्याधरतीवर त्यांनी मागितलेली माहिती देण्याचे आदेश व्हावेत.

६. सुनावणीवेळी जन माहिती अधिकारी यांनी असे विषद केले की, अपिलार्थीनी जी माहिती मागितली आहे त्या रजिस्टरमध्ये त्यांचे नाव अथवा केस नंबरची नोंद दिसून येत नाही. तसेच, आरोपीचे नाव व केस नंबर मकोका कोर्टाच्या बोर्डवर प्रदर्शित करण्यात येते व सदर बोर्ड त्या-त्या दिवशी ठेवण्यात येते. तर, कबुली जबाब हे गोपनीय असतात. आऊटवर्ड रजिस्टरमध्ये अन्य लोकांची माहिती असते. म्हणून, अपिलार्थी यांना कलम ८ (१) (g), कलम ११ व महाराष्ट्र जिल्हा न्यायालय, माहिती अधिकार (सुधारित) नियम, २००९ मधील नियम १३ (d) नुसार माहिती नाकारण्याची कार्यवाही केली आहे.

७. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थीनी दि.१४.१०.२०१९ च्या माहिती अर्जान्वये वरील परि क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहितीची मागणी केली होती. त्यास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.११.२०१९ च्या पत्रान्वये वरील नमूद परि क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सविस्तर उत्तर दिले आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २१.१२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले आहे.

एकंदरीत या प्रकरणात जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**उपरोक्त विवेचनासह अपील अमान्य करुन निकाली काढण्यात येत आहे.**

सुनील पोरवाल

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : ११.०२.२०२२**

State Information Commission Greater Mumbai